# दारिद्र्य रेषा गणना - प्रश्न आणि पर्याय
# 'प्रयास' आयोजित विचारविनिमय बैठक

## आधारभूत टिपण व बैठकीचा संक्षिप्त अहवाल

प्रयास

संसाधने आणि उपजीविका गट
प्रयास, पुणे

फेब्रुवारी २००४

# प्रस्तावना

'प्रयास' संस्थेमधील संसाधने व उपजीविका गट गेल्या तीन वर्षांपासून नैसर्गिक संसाधने आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या उपजीविका या विषयावर काम करीत आहे. तृणमूल पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना माहिती, ज्ञान, विश्लेषण व संशोधनाचे पाठबळ पुरवणे हे संसाधने व उपजीविका गटाच्या कामाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. याआधी या गटातर्फे महाराष्ट्रातील अभ्यासक आणि कार्यकर्ते यांच्या बरोबर 'रुढ आणि पर्यायी विकास प्रतिमान (model)', 'वंचिताभिमुख विकासविचार व व्यूहनीती', 'आदिवासी उपजीविकांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास' या विषयावर चर्चासत्रे आयोजित केली होती.

कार्यकर्त्यांबरोबर चर्चासत्राच्यावेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेमधून सध्या सरकारतर्फे ग्रामीण भागात चालू असलेल्या दारिद्र्य रेषा गणनेच्या प्रक्रियेतील गंभीर त्रुटी आणि त्यामध्ये तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज पुढे आली. काही कार्यकर्त्यांनी या प्रश्नावर आधीपासून काम सुरू केले होते. परंतु त्यांनी हे काम व्यापक पातळीवर होण्याची आणि महाराष्ट्रातील विविध भागातून या प्रक्रियेला आव्हान मिळण्याची गरज मांडली. याबाबत महाराष्ट्रातील जे कार्यकर्ते या प्रश्नावर काम करू इच्छितात त्या सर्वांची एकत्र बैठक प्रयासने बोलवावी अशी सूचना पुढे आली.

यानुसार या बैठकीची तयारी म्हणून प्रयासतर्फे दारिद्र्यरेषा गणना प्रक्रियेवर एक प्राथमिक टिपण तयार करण्यात आले. यामध्ये दारिद्र्य रेषा गणना प्रक्रियेवर अभ्यासकांनी कोणकोणते आक्षेप घेतलेले आहेत, याचा अभ्यास करून त्यांचे संकलन करण्यात आले. तसेच या प्रश्नावर आधीपासून काम करीत असणाऱ्या परिवर्तन, चिपळूण येथील कार्यकर्ते श्री. अशोक कदम यांची सविस्तर मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीच्या आधारे या गणना प्रक्रियेवर कार्यकर्त्यांचे कोणते आक्षेप आहेत याचे सविस्तर संकलन करण्यात आले. याचबरोबर या प्रक्रियेत हस्तक्षेप करायचा असल्यास कोणते कृती कार्यक्रम असू शकतात याची मांडणी करण्यात आली. अशातऱ्हेने दारिद्र्यरेषा गणना प्रक्रियेवरील अभ्यासकांचे आक्षेप, कार्यकर्त्यांचे आक्षेप आणि पुढील कृती व उपक्रम अशा तीन भागांत प्राथमिक टिपण तयार करण्यात आले. बैठकीच्या तयारीसाठी हे टिपण सर्व निमंत्रित कार्यकर्त्यांना आधी पाठवण्यात आले. सदर दस्तावेजात या टिपणाचा समावेश केला आहे.

या प्रक्रियेदरम्यान काही कार्यकर्त्यांनी आत्ताच्या गणना प्रक्रियेत गावपातळीवर हस्तक्षेप करण्यापेक्षा दारिद्र्यरेषा गणना प्रक्रियेला व्यापक पर्याय उभे करण्यासाठी काम करण्याची गरज मांडली. दारिद्र्य–निर्मूलनाच्या चौकटीला आव्हान देऊन ती बदलण्यासाठी काय करता येईल यावर बैठकीत विचार–विनिमय व्हावा असे सुचवण्यात आले.

सदर बैठक दि. ८ फेब्रुवारी २००४ रोजी पुणे येथे झाली. या बैठकीसाठी महाराष्ट्रातील संस्था/संघटनांचे सुमारे ५० कार्यकर्ते सहभागी झाले होते. बैठकीमध्ये या प्रक्रियेत तातडीने हस्तक्षेप करण्यासाठी काय करता येईल याबरोबरच व्यापक पर्यायांचीही चर्चा झाली. ही प्रक्रिया पुढे नेण्यासाठी कार्यकर्त्यांनी अनेक उपयुक्त सूचना केल्या. या बैठकीत झालेल्या चर्चेचा संक्षिप्त अहवाल या दस्तावेजात समाविष्ट केला आहे.

या चर्चेमध्ये गावांगावांत गणना–प्रक्रिया नीट झाली आहे की नाही हे तपासण्यासाठी प्रयासने एक तपासणी–यादी (Check List) तयार करावी असे सुचवण्यात आले. त्यानुसार आम्ही अशी तपासणी यादी तयार केली आहे. तीही आपल्या माहितीकरता पाठवित आहोत.

सदर दस्तावेज या विषयावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उपयुक्त ठरेल असे आम्हाला वाटते. या प्रक्रियेविषयी तसेच दस्तावेजाविषयी आपल्या काही सूचना, मते असतील तर आम्हाला जरूर कळवावीत.

# अनुक्रमणिका


१. प्रस्तावना

२. चर्चासत्राचा संक्षिप्त अहवाल १

३. दारिद्र्यरेषा गणना
गावातील प्रक्रिया पारखण्यासाठी वापरायची तपासणी यादी १०


ज्या कार्यकर्त्यांना या बैठकीसाठी तयार केलेले प्राथमिक टिपण याआधी पाठवण्यात आले आहे, त्यांच्या दस्तावेजात या बैठकीचा संक्षिप्त अहवाल आणि तपासणी यादी यांचाच फक्त समावेश केला आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

# दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना २००२,
# प्रश्न आणि पर्याय : विचारविनिमय बैठकीचा अहवाल

**प्रस्तावना**

सुरुवातीला प्रयासतर्फे सुबोध वागळे यांनी प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटाच्या कामाचा तसेच प्रयासने कार्यकर्त्यांबरोबर आतापर्यंत घेतलेल्या चर्चासत्रांचा थोडक्यात आढावा घेतला आणि सदर विचार–विनिमय बैठकीचा उद्देश स्पष्ट केला. ते म्हणाले : 'तृणमूल पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना माहिती, ज्ञान व संशोधनाचे पाठबळ पुरवणे हा प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटाच्या कामाचा मुख्य भाग आहे. या बैठकीआधी कार्यकर्त्यांबरोबर – 'विकासाची संकल्पनात्मक मांडणी', पर्यायी विकासनीतीची संकल्पना आणि व्यूहरचना', 'आदिवासी उपजीविकांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास' अशा विषयांवर चर्चासत्रे झालेली आहेत. चर्चासत्राच्या वेळी कार्यकर्त्यांबरोबर झालेल्या चर्चेत श्री. अशोक कदम (परिवर्तन, रत्नागिरी) यांनी सध्या चालू असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणनेवर काम करण्याची गरज मांडली. इतर काही कार्यकर्त्यांनी आत्ताच्या दारिद्र्य रेषा गणनेच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करून ती सुधारण्यापेक्षा दारिद्र्यनिर्मूलनाच्या व्यापक चौकटीला आव्हान देऊन ती चौकट बदलण्याच्या दृष्टीने विचार करण्याची गरज मांडली. कार्यकर्त्यांशी झालेल्या प्राथमिक चर्चेमधून या विषयावरील प्रामुख्याने दोन विचारप्रवाह स्पष्ट झाले. १) गणना पद्धतीची सध्याची चौकट मान्य करून ती अधिक अर्थपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. २) गणना पद्धती व प्रक्रियेत सुधारणा करण्याऐवजी दारिद्र्यनिर्मूलनाची मूळची चौकटच बदलण्याची गरज आहे. अभ्यासकांचे या गणनेवरील आक्षेप आणि परिवर्तन (रत्नागिरी) संस्थेचा प्रत्यक्ष अनुभव या दोन्हींचा अभ्यास करून एक टिपण तयार केले आणि विविध कार्यकर्त्यांना पाठवले. गणनेबद्दलच्या दोन्ही विचार–प्रवाहांची देवाण–घेवाण व्हावी आणि त्यातून कृतीचे काही पर्याय निश्चित व्हावेत, या उद्देशाने सदर विचारविनिमय बैठक आयोजित केलेली आहे.'

बैठकींची विभागणी चार सत्रांमध्ये झालेली होती.

## सत्र पहिले : गणना पद्धती – कार्यकर्त्यांचे अनुभव आणि आक्षेप

सत्राच्या सुरुवातीला सीमा काकडे यांनी 'गणनापद्धतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सध्याच्या गणनेवरील अभ्यासक व कार्यकर्त्यांचे आक्षेप' यावर मांडणी केली. ही मांडणी सर्व सहभागींना आधीच पाठवण्यात आलेल्या टिपणावर आधारीत होती.

या मांडणीनंतर विविध मुद्द्यांबाबत चर्चा झाली.

### १) गणनेची सध्याची स्थिती

महाराष्ट्रातील नंदुरबार, जुन्नर, आंबेगाव, मराठवाडा, सोलापूर, कोल्हापूर, दौंड, सांगली, करमाळा या भागांतील कार्यकर्त्यांच्या माहितीनुसार सहा महिने ते एक वर्षापूर्वी गणनेचे काम सुरू झालेले असून बहुतेक ठिकाणी आतापर्यंत सर्वेक्षण झालेले आहे आणि ग्रामसभेने कुटुंबांच्या याद्या तयार करण्याचे कामही पूर्ण होत आलेले आहे. ग्रामसेवक व आरोग्य कर्मचाऱ्यांनी, तर काही ठिकाणी शिक्षकांनी सर्वेक्षणाचे काम करायला नकार दिल्यामुळे तलाठी, शिक्षणसेवक, सुशिक्षित बेकार यांच्याकडून सर्वेक्षणाचे काम जबरदस्तीने करून घेण्यात आले. काही ठिकाणी स्वयंसेवी संस्थांनी सर्वेक्षण करण्याची तयारी दाखवूनही शासनाकडून त्यांना परवानगी मिळाली नाही. काही ठिकाणी मात्र, गणनेची सुरुवात एक वर्षापूर्वीच झालेली असली तरी अद्याप हे सर्वेक्षण पूर्ण झालेले नाही.

### २) गणना–प्रक्रियेवरील आक्षेप

गणना प्रक्रियेवर घेण्यात आलेले प्रमुख आक्षेप याप्रमाणे होते –

- अपुरी पूर्वतयारी – प्रगणकांचे व ग्रामपंचायतींचे प्रशिक्षण करणे, गावकऱ्यांना गणना–प्रक्रियेची माहिती देणे अशी तयारी न करताच बहुतेक ठिकाणी सर्वेक्षण सुरू करण्यात आले.

- चुकीचे गुणांकन – प्रगणकांनाच निर्देशक व त्यामागील गृहीतके न समजल्यामुळे चुकीचे गुणांकन झाले आणि परिणामी गरीब कुटुंबे यादीतून वगळली गेली.
- अपुरे सर्वेक्षण –
  - स्थलांतराच्या काळातच सर्वेक्षण झाल्यामुळे आदिवासी कुटुंबांचा सर्वेक्षणात समावेशच झाला नाही. रोजच स्थलांतर करणाऱ्या पारध्यांसारख्या भटक्या समूहांचाही सर्वेक्षणात समावेश झाला नाही.
  - स्वयंसेवी संस्था–संघटनांनी माहिती देऊनही प्रगणक आदिवासी वस्त्यांवर गेले नाहीत. जुन्नर तालुक्यात स्वयंसेवी संघटनेच्या प्रयत्नांमुळे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने कातकरी कुटुंबांकडून भरून घेण्याचा फॉर्म तयार केला, पण त्यांची गंभीर दखल घेतली गेलीच नाही. राजकीय हस्तक्षेपामुळे एखाद्या संपूर्ण आदिवासी वाडीचाच समावेश दारिद्र्यरेषेखाली झाल्याचे उदाहरणही या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.
  - रेशनकार्ड वेगळे नाही या कारणाने विधवा व परित्यक्तांचाही सर्वेक्षणात समावेश केला गेला नाही. स्वयंसेवी संघटनेच्या प्रयत्नांमुळे गट विकास अधिकाऱ्यांनी त्याबाबत आदेश देऊनही त्याचा उपयोग झाला नाही.
  - अशा वंचित घटकांचा गणनेमध्ये समावेशच न झाल्यामुळे त्यांना दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना मिळणारे कोणतेच फायदे उदा. रेशनकार्ड इ. मिळणार नाही. आदिवासींना योग्य प्रकारचे रेशनकार्ड न मिळाल्यास पुरेशा अन्न– धान्याअभावी त्यांचे स्थलांतर चालूच राहील.
  - काही ठिकाणी योग्य ती माहिती देऊ शकणारी व्यक्ती घरात नसतानाच सर्वेक्षण केले गेले. परिणामी आवश्यक ती माहिती न मिळाल्यामुळे अशी कष्टकरी कुटुंबे गणनेमधून वगळली गेली.
- सर्वेक्षणातून मिळवलेल्या माहितीची विश्वासार्हता –
  - अनेक गावांत कुटुंबांची, विशेषतः स्थलांतरित तसेच आदिवासी, दलित अशा वंचित कुटुंबांची माहिती पोलिस–पाटील अथवा सरपंचांकडून घेतली गेली. काही ठिकाणी शिक्षकांनी प्रत्यक्ष गावात न जाताच विद्यार्थ्यांकडूनच त्यांच्या कुटुंबांची माहिती भरून घेतली.
  - आदिवासी भागात प्रगणकांना स्थानिक भाषा येत नसल्याने प्रगणकांनी त्यांना समजेल तशी माहिती लिहिली.
- लोकसहभागाचा अभाव –
  - सर्वेक्षणाच्या आधारे गावकऱ्यांच्या गरीब ते श्रीमंत अशा याद्या निश्चित करण्यासाठी अनेक ठिकाणी ग्रामसभा झाल्याच नाहीत.
  - जेथे ग्रामसभा झाल्या, तेथे अतिशय मर्यादित उपस्थिती होती. गावातील गरीब, वंचित कुटुंबे ग्रामसभांना उपस्थित नव्हती.
  - काही ठिकाणी, महिला वा दलित व्यक्ती सरपंच असल्यास ग्रामसभांना उपस्थिती अतिशय कमी राहिली.
  - काही ठिकाणी ग्रामसभेऐवजी गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनीच संगनमताने यादी निश्चित केली. याला विरोध करणाऱ्या, प्रश्न विचारणाऱ्यांनाही यादीत समावेश करण्याचे आमिष दाखवून गप्प बसवण्याचा प्रयत्न झाला.
  - शासकीय कामासाठी पैसे द्यावे लागतात या मानसिकतेतून यादीत समावेश करण्यासाठी लोकांनी पैसे देऊ केले.
  - याद्या निश्चितीसाठी नियुक्त झालेले शासकीय अधिकारीही ग्रामसभांना उपस्थित राहिले नाहीत. काही ठिकाणी कच्च्या यादीला मान्यता देण्यासाठी झालेल्या ग्रामसभेला शासकीय अधिकारीही उपस्थित होते. या अधिकाऱ्यांनीच काही वेळा उपस्थित गावकऱ्यांवर कच्ची यादी मान्य करण्याचे दडपण आणले.

- जेथे संघटनांच्या प्रयत्नांनी लोकजागृती होऊन, 'गणना अमान्य असल्याचे व पुन्हा सर्वेक्षण घेण्याचे' ठराव ग्रामसभांनी संमत केले, तेथे हे ठरावही दुर्लक्षित करण्यात आले.
- काही आदिवासी भागात 'तीस किलोमीटरच्या परिसरात, १९७ गावांसाठी ४२ ग्रामपंचायती' अशी परिस्थिती आहे. यामुळे आदिवासींच्या ग्रामसभा–उपस्थितीवर मर्यादा पडल्या.

### ३) कुटुंब–पत्रक व निर्देशकांवरील आक्षेप

- **कुटुंब पत्रकातील संदिग्धता** – कुटुंब तसेच मिळकत या संज्ञांबाबत पुरेशी स्पष्टता नाही. उदा. एका घरात राहणाऱ्या, एक रेशनकार्ड वापरणाऱ्या परंतु वेगवेगळ्या चुलींवर शिजवणाऱ्या दोन भावांना एक कुटुंब म्हणायचे की दोन वेगवेगळी कुटुंबे? उत्पन्न म्हणजे खर्च धरून की निव्वळ उत्पन्न? विसंगती निर्माण करणारे निकष म्हणून खालील निर्देशकांवर आक्षेप घेतले गेले.
  - **स्वच्छतेची सुविधा (कच्चा/पक्का संडास)** – आदिवासी तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी राबविल्या जाणाऱ्या घरकुल योजनेत आधी पक्का संडास बांधणे बंधनकारक असते. याचाच वापर त्या कुटुंबाला दारिद्र्यरेषेच्या बाहेर ठेवण्यासाठी केला जातो. आदिवासी कुटुंबांना नको असतानाही आधी पक्का संडास दिला जातो आणि नंतर 'पक्का संडास' आहे म्हणून दारिद्र्यरेषेतून वगळले जाण्याची शक्यताही निर्माण होते.

    खरे पाहता 'सर्वांसाठी आरोग्य' ही शासनाची जबाबदारी असल्याने शासनाने पक्के संडास पुरवणे अपेक्षितच आहे. त्याचा वापर गरिबीचा निकष म्हणून करणे चुकीचे आहे.
  - **अर्थसाह्याची पसंती** – एक लाख/त्यापेक्षा जास्त आर्थिक साह्य फेडण्याची ऐपत गरीब कुटुंबांमध्ये असणार नाही, म्हणजेच हा पर्याय निवडणारे कुटुंब गरीब असणार नाही, असे शासनाचे गृहीतक आहे. गरीब कुटुंबांची मानसिकता या गृहीतकामध्ये ओळखलेली नाही, त्यामुळे प्रत्यक्षात मात्र गरीब कुटुंबे हा पर्याय निवडतात.
  - **कर्जबाजारीपण** – कोणतेही कर्ज नसलेले कुटुंब गरीब असणार नाही असे शासनाचे गृहीतक आहे. प्रत्यक्षात मात्र गरीब कुटुंबांना ऐपत व पत नसल्यामुळे कोणतेही कर्ज मिळतच नाही ही वस्तुस्थिती असते.
  - **कपड्यांची उपलब्धता** – या निकषात स्थानिक परिस्थितीचा विचार केलेला नाही. उदा. गुजरातच्या सीमेजवळील आदिवासी भागात कपडे जेमतेम १०–२० रुपयांना कपडे मिळत असल्यामुळे गरीब कुटुंबांनाही ५–६ जोड विकत घेणे परवडते. त्यामुळे कपडे हा त्यांच्या गरिबीचा निर्देशक असू शकत नाही. आदिवासींची एका कपड्याला एक जोड म्हणून मोजण्याच्या सवयीमुळे कपड्यांची संख्या अधिकच वाढते, हेही या निकषांमध्ये लक्षात घेतलेले नाही. मराठवाड्यात आंबेडकरी चळवळीच्या प्रभावामुळे दलितांचे राहणीमान सुधारलेले आहे. त्यांच्याकडील कपडे वा इतर सुविधा यावरून त्यांची गरिबी मोजली जाऊ शकत नाही.
  - **कुटुंबाजवळची मालमत्ता/साधने** – समाजाच्या एक वर्गात श्रीमंती वाढत गेली की श्रीमंतांकडून गरिबांना मिळणाऱ्या उपभोग्य वस्तूंमधेही वाढ होते. त्यामुळेच एखाद्या वीटभट्टीवर मजुरी करणाऱ्या कुटुंबाकडेही रेडिओ किंवा टेप असल्याचे दिसून येते. अशा साधनांवरून त्या कुटुंबांची गरिबी मोजणे चुकीचे आहे. बदलत्या काळानुसार 'मालमत्ता' या संज्ञेची कल्पना व ती मोजण्याची पद्धतही बदलणे आवश्यक आहे.

### ४) गणना पद्धतीवरील आक्षेप

गणनाप्रक्रियेच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी आहेतच, पण केवळ त्यांचा विचार करून चालणार नाही. कारण अशा प्रकारच्या गणना–पद्धतीतच काही मूलभूत उणिवा आहेत; या विचारातून काही आक्षेप मांडले गेले, ते याप्रमाणे –

- ज्याप्रमाणे 'कॅलरी–फॉर्म्युला' शास्त्रीय निकषांच्या आधारे आणला गेला, त्याप्रमाणे सध्याच्या गणना–पद्धतीसाठी कोणते शास्त्रीय आधार आहेत हे स्पष्ट करण्यात आलेले नाहीत.

- गणना करण्याआधीच गरिबीची कमाल टक्केवारी किती असली पाहिजे याची मर्यादा शासनाने घालून दिलेली आहे, हे हास्यास्पद आहे.
- राज्यांसाठी 'Trend - setting' करण्याच्या 'राष्ट्रीय नमुना पाहणी'(NSS) च्या या कार्यपद्धतीचीच चिकित्सा व्हायला हवी.
- गणनापद्धतीचा मुख्य भर 'वगळण्यावर' आहे. ग्रामसभेला एखाद्या कुटुंबाचे नाव काढण्याचा अधिकार आहे, पण समाविष्ट करण्याचा मात्र नाही, हे याचेच उदाहरण आहे. 'दारिद्र्य–निर्मूलनासाठी खर्च होणारा आमचा पैसा वाया जाऊ नये, म्हणून चुकीचे कुटुंब आत येऊ नये', यावरच भर दिल्यामुळे 'समावेश' कोणाचा करायचा याच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे.
- गरिबी मोजण्यासाठी संपूर्ण देशाला सारखेच निकष लावलेले आहेत, वेगवेगळ्या स्थानिक परिस्थितीनुसार त्यात बदल केलेला नाही.
- सामाजिक–आर्थिक निकषांचा एकत्रित विचार करण्याचा प्रयत्न केवळ हास्यास्पद आहे, कारण अतिशय गरीब उदा. पददलित किंवा गटाराच्या कडेला राहणाऱ्या कुटुंबांचा या निकषांमुळे समावेश होऊ शकत नाही.
- या गणना–पद्धतीनुसार एखाद्या गरीब कुटुंबाचा यादीमध्ये एकदा समावेश झाला नाही, तर पुढची पाच वर्षे त्या कुटुंबाला कोणत्याही सवलती/सुविधा मिळत नाहीत. यादीत समावेश नाही म्हणून गरीब कुटुंबांचा जगण्याचा हक्कच त्यामुळे नाकारला जातो.
- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना हा सरकारी कार्यक्षमतेचा केवळ देखावा आहे. खुल्या बाजारपेठेची व्यवस्था राबवताना गरिबांपुढे फेकलेला हा तुकडा आहे. अशा पद्धतीने गणना करणे ही गरिबांची क्रूर चेष्टा आहे.

## ५) सुचवलेले व केलेले उपाय

- गणना पद्धतीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संघटना व संस्थांनी विविध प्रयत्न केलेले आहेत –
  - कार्यक्षेत्रातील गावांचे पुनर्सर्वेक्षण
  - ग्रामपंचायत सदस्यांचे गणना–प्रक्रियेबद्दल प्रशिक्षण व लोकजागृती
  - पुनर्सर्वेक्षणाबाबत ग्रामसभांचे ठराव करून घेणे
- गणना सुरू होण्यापूर्वी 'सर्वहारा जनआंदोलन'ने मुख्य सचिव व सुप्रीम कोर्टाचे कमिशनर यांच्याकडे खालील मागण्या केल्या
  - 'वगळण्याची' चौकट बदलली जावी.
  - अति गरीब कुटुंबांसाठी संघटनेने सुचवलेल्या नऊ निकषांपैकी एकाही प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असल्यास त्या कुटुंबांचा दारिद्र्यरेषेखाली समावेश केला जावा.
  - महाराष्ट्रातील गणना केरळ मॉडेलनुसार घेतली जावी.
  - खऱ्या सामाजिक–आर्थिक निकषांचा समावेश केला जावा.
- विविध संघटनांनी आपापल्या भागातील वंचित समूहांबाबत शासकीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी माहिती दिली.
- या प्रत्यक्ष उपायांच्या जोडीने, पहिल्या सत्रातील चर्चेतून खालील सूचना मांडल्या गेल्या.
  - स्थलांतर हाच गरिबीचा निकष मानला जावा.
  - दारिद्र्यरेषेखाली समावेश होण्याचे उपयोग कोणकोणते असतात, याची वंचित समूहांना नीट माहिती दिली जावी.
  - स्थानिक वास्तवानुसार गरिबी मोजण्याच्या निकषांचा विचार व्हावा.

- मालमत्ता, राहणीमान अशा निकषांऐवजी उत्पन्नाचे साधन, कर्जाची उपलब्धता या निकषांना गरिबी ठरण्यासाठी प्राधान्य दिले जावे.
- सर्वेक्षणाची वेळ लोकांच्या सोयीने ठरवण्यात यावी. गरीब/वंचित समूहांची माहिती नीट नोंदली जाण्यासाठी संध्याकाळच्या वेळी, चावडीवर एकत्रितपणे माहिती भरून घेण्यात यावी.
- वंचित समूहांच्या सहभागासाठी आदिवासी गावसभांना तसेच दलित व महिलांच्या गावसभांना, ग्रामसभेप्रमाणेच याद्या निश्चित करण्याचे हक्क मिळावेत.

## सत्र दुसरे : व्यापक पर्याय – गणनेपलिकडचे प्रयत्न

दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला मिलिंद बोकील यांनी गणनेपलिकडचे व्यापक पर्याय काय असू शकतील याची मांडणी केली. या मांडणीचा सारांश खालील प्रमाणे –

गरिबांना 'गरीब' म्हणून शासनाची मान्यता मिळणे ही दारिद्र्य–निर्मूलनाच्या प्रक्रियेची पहिली पायरी असली तरी 'गरीब म्हणून मान्यता मिळाल्यामुळे' गरिबीचा प्रश्न सुटणार नाही. अन्याय आणि विषमता दूर कशी करायची हा दारिद्र्य–निर्मूलनासाठी मूलभूत प्रश्न आहे.

अन्याय आणि विषमता या प्रश्नांच्या अनुषंगाने गरिबीचा प्रश्न हाताळला पाहिजे या विचाराची वाढ महाराष्ट्रात गेल्या काही दशकांमध्ये हळूहळू होत गेली आहे. वंचितांच्या हाती उत्पन्नाची साधने मिळावीत म्हणून १९५०–६५ या कालावधीतील 'कूळ–कायद्याची' अंमलबजावणी ही या विचाराची पहिली पायरी होती. या काळानंतरच, वंचितांना उत्पन्नाची साधने मिळावीत म्हणून, भूमिहीनांना जमीन मिळण्यासाठी 'जबरन जोत आंदोलन', मराठवाड्यातील दलितांची गायरानांवरील आक्रमणे आणि आदिवासींचे हक्कांसाठीचे लढे चालू होते, अजूनही चालू आहेत. वंचितांचा उत्पन्नाच्या साधनांवर ताबा टिकून राहावा यासाठीचे लढे व चळवळी हा याच्यापुढचा टप्पा होता. पाणी–पंचायत, संयुक्त जंगल व्यवस्थापन, भू–दान चळवळ यांसारख्या चळवळी याच टप्प्यावर यशस्वी झाल्या. नैसर्गिक साधनांवरील हक्कांचे लढेही या टप्प्यावर सुरू झाले. नैसर्गिक साधनांवरील हक्क व न्याय्य पुनर्वाटपाच्या चळवळीनंतर 'नैसर्गिक साधनांची उत्पादन–क्षमता कशी वाढवायची, त्याचा विकास कसा करायचा, याचा विचार करण्याची गरज आहे.

याच काळात विकासप्रक्रियेला समांतर अशा काही प्रक्रियाही वेगाने सुरू झाल्या. त्या म्हणजे 'शहरीकरण, औद्योगीकरण आणि आधुनिकीकरण'. या तीन प्रक्रियांच्या आक्रमणामुळे नैसर्गिक साधनांच्या वापराचा पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. येत्या वीस वर्षांत ६०% महाराष्ट्र शहरी झालेला असेल, औद्योगिकीकरणामुळे कृषी–उद्योगांची पीछेहाट झालेली असेल, हे लक्षात घेऊनही नैसर्गिक साधनांच्या वापराचा पुनर्विचार करण्याची गरज आहे कारण आजमितीस खूप मोठ्या समाजाची उपजीविका नैसर्गिक साधनांवरच अवलंबून आहे व किमान येती २५ वर्षे ती तशी राहणार आहे. तसेच भविष्यात उपजीविकेचा जोडधंदा म्हणून नैसर्गिक साधनांना निश्चितपणे महत्त्वाचे स्थान आहे.

नैसर्गिक साधनांची उत्पादकता वाढवण्याचे काही प्रयत्न महाराष्ट्रात यशस्वी झालेले असले तरीही ते पुरेशा प्रमाणात झालेले नाहीत, व्यवहारात्मक तसेच धोरणात्मक पातळीवरही सक्षम असे पर्याय अद्यापही उभे राहिलेले नाहीत. शहरीकरण, औद्योगीकरण आणि आधुनिकीकरण या तीन प्रवाहांना रोखण्यासाठी प्रभावी समर्थनाची गरज आहे. हे समर्थन प्रभावी बनविण्यासाठी पुढील गोष्टींची गरज आहे: नैसर्गिक साधनांची नेमकी स्थिती काय आहे याचे चित्र उभे करणे; लोकांच्या उपजीविकेचा नैसर्गिक साधनांशी काय संबंध आहे हे स्पष्ट करणे; हा संबंध शाश्वत कसा आहे, हे स्पष्ट करणे.

यानंतर मिलिंद बोकील यांच्या मांडणीवर चर्चा झाली. अजित अभ्यंकर यांनी या चर्चेचे सूत्रसंचालन केले. या चर्चेत व्यापक पर्यायांच्या विविध अंगांवर मुद्दे मांडले गेले, त्यांचा गोषवारा खालीलप्रमाणे –

### विकास–योजना/दारिद्र्य–निर्मूलन योजना

- दारिद्र्य–रेषेबद्दलची मूलभूत समज बदलून दारिद्र्य–निर्मूलन योजनांची संपूर्णपणे चिकित्सक पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे.

- विकासाची 'मॉडेल्स' निर्माण करून त्यानुसार एकसारख्या विकास योजना आखण्याऐवजी लोकांच्या पुढाकारातूनच योजना आखल्या जाव्यात.
- बदलती स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन स्थानिक गरजांशी सुसंगत अशा योजना आखल्या जाव्यात.
- कार्यक्षम सरकारी कारभारासाठी व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी धोरणवकिली (ॲडव्होकसी) करणे महत्त्वाचे आहे.
- लोकांचा माहिती मिळण्याचाच नव्हे, तर ती निर्माण करण्याचा हक्कही शासनाने मान्य केला पाहिजे.

**गरिबीची संकल्पना व दारिद्र्य-निर्मूलनाचे प्रयत्न**

गरिबी म्हणजे केवळ आर्थिक साधनांचा अभाव नव्हे, तर सामाजिक-आर्थिक व राजकीय अशी कोणतीही ताकद नसणे, शोषण-व्यवस्थेचा कसलाच प्रतिकार करता न येणे, म्हणजे गरिबी. त्यामुळेच केवळ आर्थिक साधन देऊन गरिबी दूर होणार नाही. दारिद्र्य-निर्मूलनाचे कोणतेही कार्यक्रम हे सत्ता-संतुलनाला हात घालणारे आणि व्यवस्थेशी झगडण्याचे बळ देणारे असतील तरच त्यांचे परिणाम शाश्वत राहतील.

**नैसर्गिक साधनांचा हक्क व विकास**

- नैसर्गिक साधनांची उत्पादनक्षमता वाढवण्याच्या जोडीनेच नैसर्गिक साधनांचे हक्क आणि त्यांचे न्याय्य पुनर्वाटप याच्यासाठीही प्रयत्न करायला हवेत.
- नैसर्गिक साधनांच्या विकासातून शाश्वत उपजीविका चालवण्याचे प्रयोग करणे महत्त्वाचे आहे.
- नैसर्गिक साधनांची उत्पादकता वाढवण्यासाठी गुंतवणूक करावी लागते आणि गरीब कुटुंबांची अशी गुंतवणूक करण्याची ऐपत नसते म्हणून मोठ्या कंपन्यांनी 'कॉन्टॅक्ट किंवा कंपनी फार्मिंग' (व्यापारी तत्त्वावरील उत्पादन) करण्याची पद्धतही काही आदिवासी भागांमध्ये सुरू झाली आहे. हे आक्रमण थोपवण्यासाठी छोट्या शेतकऱ्यांना करता येईल अशा 'कमी बाह्य साधनांच्या शेतीसारखे' पर्याय शोधणे आवश्यक आहे.
- बचत-गटांना मिळणाऱ्या शासकीय अनुदानाचा वापर करून महिलांच्या सहभागातून नैसर्गिक संसाधनांच्या विकासाचे उपक्रम राबवता येतील.

**रोजगाराचा प्रश्न व रोजगार हमी योजना**

- किमान वेतन व्यवस्थेची पुनर्मांडणी व्हावी.
- रोजगार हमी योजनेत होणाऱ्या शोषण व फसवणुकीला आळा घातला जावा.
- रोजगार हमी योजनेत केवळ सामूहिक उपयोगाची कामे केली जातात, पण गरिबांना उपयोगी पडू शकतील अशी खाजगी मालकीची कामे केली जात नाहीत.
- रोजगाराचा 'हक्क' प्रत्यक्षात येण्यासाठी गरीब कुटुंबांना वर्षातील किमान २०० दिवस रोजगाराची हमी मिळाली पाहिजे.
- रोजगार-हमी योजनेत रोजगाराचा मोबदला म्हणून धान्य देणे उपयोगी ठरावे.
- शासकीय आकडेवारीनुसार रोजगार असूनही दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांची संख्या बेरोजगार कुटुंबांपेक्षा जास्त आहे.
- जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील भांडवल निर्मिती थांबली आहे. परिणामी कोणतीही नवीन विकास योजना सुरू झालेली नाही. सार्वजनिक क्षेत्रात भांडवल निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगार-निर्मिती होणे गरजेचे आहे. त्यासाठी 'रोजगाराची' कल्पना अतिशय व्यापक होणे आवश्यक आहे.

  उदा. सार्वजनिक उपयोगाचे कोणतेही काम-जसे की जंगल उभे करणे, कचरा-व्यवस्थापन, हे 'रोजगार' म्हणून

गणले जायला हवे. रोजगार हे दारिद्र्य–निर्मूलनाच्या धोरणात्मक कार्यक्रमाचे इंजिन तसेच चळवळीच्या पातळीवर Rallying Point ही होऊ शकतो.

**कायदा**

कायद्यांच्या माध्यमातून शासनाने वंचित समूहांच्या भलाईचे व सक्षमतेचे चित्र उभे केले असले तरीही त्यात अनेक पळवाटा असल्याचे व हे चित्र फसवे असल्याचे दिसून येते. उदा. आदिवासी स्वशासन कायदा, राष्ट्रीय पुनर्वसन कायदा (जमीन मिळूनही पुनर्वसन झालेले नाही, स्थलांतर थांबलेले नाही.) म्हणूनच लोकांची ताकद वाढवणारे, लोकांना सक्षम करणारे कायदे व्हावेत, असलेल्या कायद्यांमुळेही लोकांची ताकद वाढावी, यासाठी चळवळ करणे महत्त्वाचे आहे.

## सत्र तिसरे : गटचर्चा

तिसऱ्या सत्रात उपस्थित कार्यकर्त्यांची विभागणी दोन गटांत करण्यात आली होती. एका गटाची चर्चा दारिद्र्य–रेषा–गणना प्रभावी कशी करायची यावर तर दुसऱ्या गटाची चर्चा ‘व्यापक पर्यायांवर’ झाली. दोन्ही गटचर्चांचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

**गट १ : गटचर्चा – दारिद्र्यरेषेची गणना अधिक प्रभावी कशी करता येईल?**

- दारिद्र्यरेषा गणना प्रभावी होण्यासाठीचा कोणताही कार्यक्रम लोकांची राजकीय समज व ताकद वाढवणारा कार्यक्रम म्हणून राबवला जावा.
- महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागांत गणनेची नेमकी स्थिती काय आहे याची तपशीलवार माहिती उपलब्ध नाही, म्हणून संस्था व संघटनांनी आपल्या भागामध्ये ही माहिती जमा करावी, या माहितीचा उपयोग शासनावर दबाव आणण्यासाठी करता येईल.
- गणना–प्रक्रियेतील त्रुटींची माहिती ठोस पुरावा म्हणून सादर करता येईल आणि त्याच्या आधारे पुनर्सर्वेक्षणाची मागणी करता येईल.
- ही सर्व माहिती जमवण्याचा उद्देश ‘सरकारी खोटेपणा उघड करणे’ हा असला पाहिजे.
- माहिती जमा करण्यासाठी प्रयासने शासकीय डॉक्युमेंटच्या आधारे गणना–प्रक्रियेची ‘चेक–लिस्ट’ तयार करावी. ही चेक–लिस्ट गावागावांतील कार्यकर्त्यांना आपापल्या गावातील गणना–प्रक्रिया शासनाने प्रमाणित केल्याप्रमाणेच होते आहे का, हे पडताळून बघण्यासाठी उपयोगी पडेल. कागदोपत्री मान्य केलेली प्रक्रिया प्रत्यक्षात यावी म्हणून शासनावर दबाव आणण्यासाठी या चेक–लिस्टच्या मदतीने गोळा केलेल्या माहितीचा उपयोग करता येईल.
- तोंडावर आलेल्या निवडणुकांच्या मदतीने राजकीय हस्तक्षेपाचा सकारात्मक उपयोग करून घेण्यासाठी ‘गरिबीच्या टक्केवारीवर कोणतीही मर्यादा असू नये, राज्यशासनांना ती ठरवण्याचे अधिकार असावेत’ असा ठराव निवडणूक–जाहीरनाम्यांमध्ये संमत करून घेता येईल.
- ग्रामसभांची ताकद वाढवण्यासाठी जेथे शासनाचे सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे, अशी पाच प्रातिनिधिक गावे निवडून तेथे संस्था–संघटनांना पुनर्सर्वेक्षण करता येईल. शासकीय सर्वेक्षण व संस्था संघटनांचे सर्वेक्षण यांतील फरक शासनावर दबाव टाकण्यासाठी वापरता येईल. त्याचप्रमाणे या पुनर्सर्वेक्षणाचा अहवाल निवडणुकांच्या तोंडावर शासनावर दबाव आणण्यासाठी वापरता येईल.

चेक–लिस्टच्या मदतीने माहिती जमविणे व पुनर्सर्वेक्षण करणे या सर्व प्रयत्नांच्या समन्वयाची जबाबदारी ‘अन्न– अधिकार–अभियान‘तर्फे घेतली जाईल.

पुनर्वसन संघर्ष समिती (नंदुरबार), परिवर्तन (रत्नागिरी), किसानसभा जनविज्ञान संस्था (कोल्हापूर), महिला राजसत्ता आंदोलन (मुंबई) व रेशनिंग कृती समिती (मुंबई) या संस्था–संघटना प्रातिनिधिक पुनर्सर्वेक्षणाचे काम करतील.

पर्यायी प्रक्रिया काय असावी, पर्यायी निर्देशक कोणते असावेत याचा अभ्यास इच्छुक संस्था–संघटनांना ‘प्रयास’ बरोबर करता येईल.

**गट–२ : गटचर्चा : व्यापक पर्यायांचा विचार**

या गटचर्चेत व्यापक पर्यायाची चर्चा करण्यात आली आणि त्यानुसार काही उपक्रमही सुचवण्यात आले.

- दारिद्र्य–निर्मूलन ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून, राजकीय प्रक्रिया आहे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. विकासाच्या दृष्टिकोणातून राजकीय जाणिवा आणण्यासाठी रचनात्मक संघर्षाची गरज आहे.
- प्रस्थापित सत्ता–समीकरणांमध्ये हस्तक्षेपाचे व गरिबांना ताकद देण्याचे काम अग्रक्रमाने झाले पाहिजे. दारिद्र्य–निर्मूलनाची व्यापक बैठक काय असावी? त्याचबरोबर गरिबांना ताकद देण्याचे स्वयंसेवी संस्थांचे प्रयत्न कुठे कमी पडतात याची चिकित्सा होण्याची गरज आहे.
- स्थानिक गरजांवर आधारीत रोजगार–निर्मिती आणि वितरणाची न्याय्य व्यवस्था अंमलात येणे गरजेचे आहे. विषमतेवर हल्ला करणे, हे या व्यवस्थेचे उद्दिष्ट असावे. वंचित घटकांमध्ये त्यांच्या ‘वंचितपणाबद्दलची समज’ निर्माण करणे आणि या आकलनाचा उपयोग प्रस्थापित संतुलनाला हात घालण्यासाठी करणे ही गरिबांमधे ताकद निर्माण करण्याची पहिली पायरी आहे. विविध ठिकाणच्या कष्टकरी समूहांची जोडणी करण्याचे प्रयत्न त्यादृष्टीने महत्त्वाचे आहेत.
- व्यक्ती किंवा कुटुंबांऐवजी गाव किंवा समूह हे विकासाचे एकक मानले जावे. वंचित समूहांनीच त्यांच्या गरजांचा व विकासाचा आराखडा तयार करावा आणि दारिद्र्य–निर्मूलनाचे कार्यक्रम त्यानुसारच आखले जावेत. त्यासाठी, BPL धारकांच्या जागृतीची चळवळ हाती घेतली जावी.

या भूमिकेनुसार चाललेल्या व्यापक पर्यायांशी निगडित अशा काही प्रयोगांवरही चर्चा झाली. धान्य बँक, कोकणातील गावकीच्या Demonstration चे काम, 'प्रयास' चा आदिवासी उपजीविका सद्यःस्थिती तपासण्यासाठी कुटुंब डायरीचा उपक्रम अशा प्रयत्नांचा त्यात समावेश होता.

- शासनाची कल्याणकारी भूमिकेपासून वेगाने होणारी पीछेहाट लक्षात घेता, ‘कल्याणकारी शासनाच्या’ गृहीतकावर विसंबून दारिद्र्य–निर्मूलनाच्या व्यापक पर्यायांचा विचार करता येणार नाही. असे पर्याय प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ ‘ॲडव्होकसी’ अशा स्वरूपाचे प्रयत्न पुरेसे नाहीत, तर नैसर्गिक संसाधनांवरील वंचित समूहांचा हक्क टिकवणे ही त्याची पहिली पायरी आहे.
- वंचित समूहांना उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संसाधनांची वस्तुनिष्ठ मांडणी होणे गरजेचे आहे. आदिवासींनी कुटुंब–डायरी ठेवण्यासारखे प्रयत्न त्यासाठी अधिक व्यापक पातळीवर करता येतील. या मांडणीच्या आधारेच संसाधनांवरील हक्कांची ठामपणे मागणी करता येईल. संसाधनांवरील हक्क टिकवण्याच्या जोडीने संसाधनांची उत्पादकता वाढवण्याचे प्रयत्न ही दारिद्र्य निर्मूलनाची पुढची पायरी असावी.
- संसाधनांच्या माध्यमातून विकास कसा होऊ शकतो याचा अभ्यास व मांडणी व्हावी. उदा. १० गुंठ्यांचा प्रयोग.
- सरकारकडे मागणी करण्याच्या, तसेच सुविधा देऊन गरीब कुटुंबांची गरिबी दूर करण्याचा सोपस्कार करण्याच्या शासनाच्या वृत्तीमधे मूलभूत बदल होण्याची गरज आहे.
- दारिद्र्य–निर्मूलनाच्या विविध शासकीय योजनांचे संपूर्ण चिकित्सक विश्लेषण करून त्यांची पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे.
- रोजगार हमी योजना, स्वर्णजयंती रोजगार योजना अशा काही योजनांचा विश्लेषणात्मक अभ्यास केला जावा. बचतगटांचाही दारिद्र्य–निर्मूलनाच्या दृष्टिकोणातून अभ्यास करता येईल. दारिद्र्यनिर्मूलनाच्या योजना तळापर्यंत पोचवण्याचे प्रयत्न व्हावेत. त्याचप्रमाणे, या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंमलबजावणीच्या प्रशासकीय यंत्रणेतही बदल व्हायला हवा.

- श्रीमंत लोक आकर्षित होणारच नाहीत अशा प्रकारचे दारिद्र्य-निर्मूलनाचे कार्यक्रम आखले जावेत.
- दारिद्र्यनिर्मूलनाशी संबंधित धोरणांमधे बदल घडवण्यासाठी स्वयंसेवी संस्था संघटनांचा दबावगट तयार होणे महत्त्वाचे आहे.

## सत्र ४ : गटचर्चांची मांडणी

चौथ्या सत्राच्या सुरुवातीला दोन्ही गटांमध्ये झालेल्या गटचर्चांची मांडणी झाली. या मांडणीनंतर रोजगार-निर्मिती व रोजगार हमी योजना या पर्यायावर चर्चा झाली. या चर्चेचा गोषवारा पुढे दिलेला आहे.

- रोजगार हमी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. 'रोजगार हमीची कामे संपली आहेत' या शासकीय युक्तिवादाला उत्तर देण्यासाठी १) रोजगार हमीचे विधायक पर्याय सुचवता येतील. २) रोजगाराची कल्पना व्यापक करून त्याला उपक्रमशीलतेची जोड देता येईल.
- रोजगार हमी योजनेची सुरुवात 'दुष्काळ निवारणाची' योजना म्हणून झाली. त्याचप्रमाणे ही योजना कायमच जमीनदार शेतकऱ्यांच्या दबावाखाली शेतमजुरी उपलब्ध नसतानाच्या काळात राबविली गेली. शेतमजुरीला पूरक असेच या योजनेचे स्वरूप राहिले. १९७८ पासून गावपातळीवर बरीचशी कामे होऊन गेल्यामुळे, रोजगार हमी योजनेला असलेली मागणी कमी-कमी होत गेली, परिणामी त्यावरचा खर्चही कमी होत गेला. रोजगार हा एकमेव महत्त्वाचा मुद्दा होऊ शकत नाही, हे या संदर्भात लक्षात घ्यायला हवे आणि जंगल, जमीन, पाणी या नैसर्गिक संसाधनांशी रोजगाराचा प्रश्न जोडून घ्यायला हवा.
- गावातील गरिबांचे गट ठरवून, त्यांच्या गरजा व अग्रक्रम काय आहेत यानुसार रोजगाराची हमी द्यायला हवी. नैसर्गिक संसाधनांच्या विकासाची कामे त्यासाठी सुरू करता येतील. रोजगाराच्या हमीबरोबरच या गटांचा संसाधनांवरील ताबा टिकून राहावा यासाठी चळवळीच्या प्रयत्नांचीही गरज आहे.
- चळवळीच्या पातळीवर, विशेषतः 'कल्याणकारी भूमिकेपासून' शासन निवृत्त होत असतानाच्या काळात, रोजगार हा चळवळीचा एकमेव प्रेरणाबिंदू होऊ शकतो, हे लक्षात घेऊन ठोस कृती-कार्यक्रम ठरवण्याची गरज आहे.
- रोजगारासाठी दिली जाणारी अनुदाने वैयक्तिक लाभार्थीऐवजी वंचित (आदिवासी, दलित इ.) समूहांना दिली जावीत.
- ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागातही दारिद्र्य-निर्मूलनाचा आणि रोजगार हमी योजनेचा विचार होण्याची गरज आहे. आदिवासी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातही नैसर्गिक संसाधनांच्या विक्रीवर व बाजारीकरणावर बंदी घालणे आवश्यक आहे.
- 'कल्याणकारी शासनाच्या' गृहीतकावर व बाजारावर विसंबून जनआंदोलनांनी लढ्यांची आखणी केली तर ती फसतच जातात, हा धोका लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यानुसार, बाजार व सरकारच्या निरपेक्ष लोकांना तगून राहता येईल, उपजीविका करता येईल, अशी संसाधने काय आहेत याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे, अशा संसाधनांवरचा वंचितांचा ताबा टिकून राहण्यासाठी प्रयत्न करण्याचीही अतिशय गरज आहे.
- सध्याच्या शासन व्यवस्थेत व बाजारपेठेत गरिबांना स्वतःचे स्थान निर्माण करण्याची, स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

या चर्चेनंतर उपक्रम निश्चितीने बैठकीचा समारोप करण्यात आला.

**निश्चित झालेले उपक्रम याप्रमाणे -**

- काही संस्था/संघटना प्रातिनिधिक पुनर्सर्वेक्षणाचे काम करतील.
- 'प्रयास'तर्फे गणना प्रक्रियेची चेक-लिस्ट तयार केली जाईल.
- अन्न-अधिकार अभियानातर्फे या सर्व कामाचे समन्वयन केले जाईल.

* * * *

## आपल्या गावात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना योग्य प्रकारे झाली का?
## हे तपासण्यासाठीची 'तपासणी यादी' (चेक लिस्ट)

*राज्यातील गावागावांतून दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या गणना (किंवा बीपीएल् सर्व्हे) पूर्ण झाल्या आहेत किंवा अर्धवट स्थितीत आहेत. अनेक कारणांमुळे ह्या गणनांमध्ये विविध त्रुटी राहून गेल्या आहेत. अशी तक्रार सर्वत्र आढळून येते. ह्या गणनापद्धतीची रचना अशी करण्यात आली होती की पुरेसा लोकसहभाग नसल्यास अथवा प्रक्रियेची अचूक अंमलबजावणी न झाल्यास गणना अयशस्वी ठरेल. पण अनेक गावांतून लोकसहभाग व अचूक प्रक्रिया ह्या दोन्ही गोष्टींकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने गणनेमध्ये अनेक चुका राहून गेल्या आहेत. तशा चुका राहून गेल्यास फेरगणना करण्याचे अधिकार ग्रामसभेला आहेत. मात्र ही फेरगणनेची मागणी करण्यासाठी ही गणना योग्यप्रकारे झाली का हे तपासणे व त्याबाबत ठामपणे मांडणी करणे गरजेचे आहे. हे काम गावपातळीवरील कार्यकर्त्यांना योग्यप्रकारे करता यावे यासाठी ही तपासणी यादी तयार केली आहे. ह्या तपासणी यादीचा वापर करून आपल्या गावातील गणनेच्या प्रक्रियेतील त्रुटी स्पष्टपणे ओळखता येतील व संबंधित अधिकाऱ्यांना दाखवून देता येतील. ह्या त्रुटी लोकांना समजावून सांगून आवश्यकता वाटल्यास फेरगणनेची मागणी करता येईल. याबाबतीत आणखी माहितीची आवश्यकता वाटल्यास अथवा आपण वापरलेल्या तपासणी यादीचे विश्लेषण करून हवे असल्यास प्रयासशी जरूर संपर्क साधावा. तपासणी यादीचा उपयोग आपण आपल्या गावात केल्यास आम्हाला कार्ड टाकून जरूर कळवावे.*

### दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना कशाप्रकारे करावी हे सांगणारे सरकारी दस्तावेज

- खाली दिलेले सर्व प्रश्न 'गणना–प्रक्रिया कशी असावी' याबाबतच्या महाराष्ट्र शासनाच्या ग्राम–विकास व जल–संधारण विभाग 'शासन निर्णय क्र. दारेग २००२/प्र.क्र. १६६९/योजना–१', दि. २ डिसेंबर २००२ या डॉक्युमेंटच्या आधारे मांडलेले आहेत.
- या डॉक्युमेंटमधे दिलेल्या माहिती व सूचनांनुसार, तपासणी–यादीत दिलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असायला हवीत. म्हणजेच 'गणना–प्रक्रिया योग्य रीतीने पूर्ण होण्यासाठी' शासनाने या सर्व बाबी प्रमाणित केलेल्या आहेत.
- **हे आपल्याला माहिती आहे का?**
  - विभाग, जिल्हा, तालुका तसे गाव या सर्व पातळ्यांवर शासकीय अधिकाऱ्यांचे तसेच निवडलेल्या प्रगणकांचे प्रशिक्षण करण्याची जबाबदारी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची आहे.
  - प्रगणकांनी नोंदी केलेल्या कुटुंबांची तपासणी 'पर्यवेक्षकाने' करायची आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राप्ताधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, गट–विकास अधिकारी, यांच्यासारख्या शासकीय अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी पार पाडायची आहे. २०० कुटुंबे किंवा १००० लोकसंख्येसाठी एक प्रगणक व अशा पाच प्रगणकांसाठी एक पर्यवेक्षक असणे अपेक्षित आहे.
  - सर्व गणना–पत्रके भरल्यानंतर एकूण गुणांच्या आधारे ग्रामपंचायतीने प्रथम कच्ची यादी व नंतर त्या यादीबाबतची गाऱ्हाणी लक्षात घेऊन, आवश्यक ते बदल करून 'प्रारूप यादी' तयार करायची आहे. या प्रारूप यादीलाच गटविकास अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामसभेची मंजुरी घ्यायची आहे.
  - ग्रामसभेतर्फे मंजूर झालेल्या याद्या गटविकास अधिकारी जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेकडे सादर करतील. त्यानंतर राज्य–शासनातर्फे दारिद्र्यरेषेसाठीचे छाटणी गुण जाहीर केले जातील. राज्य शासनाने मान्य केलेल्या चौकटीनुसारच, जिल्ह्या–जिल्ह्यांतील, पंचायतींमधील तसेच गावा–गावांसाठीचे छाटणी–गुण वेगवेगळे असू शकतात.

## तुमच्या गावात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची गणना पूर्ण झाली असेल अथवा चालू असेल तर खाली गोष्टी झाल्या आहेत का?

(प्रश्नाचे उत्तर देताना 'हो/नाही' पैकी **नको** असेल ते खोडावे)

| तपशील | कोड |
|---|---|
| **गणना सुरू होण्यापूर्वी** | |
| **१.० गणनेची प्रसिद्धी :** | |
| १.१ गणना होणार असल्याची माहिती संपूर्ण गावात, सर्व वाड्या व वस्त्यांमध्ये दवंडी देऊन, माहिती फलक लावून ग्रामपंचायतीने दिलेली आहे का? **(हो/नाही)** | |
| १.२ गणनेबाबत सर्व गावकऱ्यांना माहिती देण्यासाठी ग्रामपंचायतीने खास सभा घेतलेल्या आहेत का? **(हो/नाही)** | |
| **२.० प्रशिक्षण :** | |
| २.१ गणना करणाऱ्या प्रगणकांचे प्रशिक्षण झाले आहे का? **(हो/नाही)** | |
| २.२ प्रगणकांच्या प्रशिक्षणात खालील बाबींचा समावेश होता का? (यासाठी शक्य तेवढ्या प्रगणकांना गाठून प्रश्न विचारावेत व प्रत्येकाच्या उत्तराची नोंद नाव-पत्त्यासकट वेगळी ठेवावी.) | |
| २.२.१ गणनेची पूर्वतयारी कशी करायची? **(हो/नाही)** | |
| २.२.२ गणना-पत्रक भरताना काय काळजी घ्यायची? **(हो/नाही)** | |
| २.२.३ गणना-पत्रकातील प्रश्न कसे विचारायचे? गुणांकन कसे करायचे? **(हो/नाही)** | |
| २.२.४ मिळणाऱ्या माहितीची खातरजमा कशी करून घ्यायची? **(हो/नाही)** | |
| २.२.५ प्रत्येक कुटुंबाचे सर्वेक्षण केले जावे यासाठी कोणते प्रयत्न करायचे? **(हो/नाही)** | |
| २.३ प्रगणकांप्रमाणेच तुमच्या गावातील ग्रामसेवक व सरपंच यांचेही प्रशिक्षण झाले आहे का? या प्रशिक्षणात खालील बाबींचा समावेश होता का? | |
| २.३.१ गणनेची पूर्वतयारी कशी करायची? **(हो/नाही)** | |
| २.३.२ प्रगणकांना काय मदत करायची? **(हो/नाही)** | |
| २.३.३ गणना-प्रक्रियेच्या पायऱ्या कोण-कोणत्या आहेत? **(हो/नाही)** | |
| २.३.४ गणना-पत्रकातील निर्देशक कोणते आहेत? त्यांना गुण कसे दिले जाणार आहेत? **(हो/नाही)** | |
| २.३.५ गावकऱ्यांना माहिती देताना काय काळजी घ्यायची आहे? **(हो/नाही)** | |
| २.३.६ सर्व गणना-पत्रके भरून झाल्यानंतर 'कच्ची यादी' कशी तयार करायची आहे? 'प्रारूप यादी' कशी तयार करायची आहे? **(हो/नाही)** | |
| २.३.७ 'प्रारूप यादीला' मान्यता घेण्यासाठी झालेल्या ग्रामसभेसाठी काय करायचे आहे? **(हो/नाही)** | |

| तपशील | कोड |
|---|---|
| **३.० प्रगणकांनी करावयाची गणनेची पूर्वतयारी :**<br>३.१ प्रगणकाने तुमच्या गावातील संपूर्ण लोकसंख्येची व वस्तीची कल्पना येण्यासाठी, गावाचा/वस्ती/वाडीचा कल्पनादर्शक नकाशा तयार केलेला आहे का? **(हो/नाही)**<br>३.१.१ गावातील प्रत्येक कुटुंब राहात असणारा भाग या नकाशात आलेला आहे का? **(हो/नाही)**<br>३.२ प्रगणकांनी केलेल्या घर–कुटुंब यादीत, गावातील प्रत्येक कुटुंबाचे नाव आलेले आहे का? **(हो/नाही)**<br>३.३ ही यादी तयार करताना कुटुंब, इमारत, वाडा, घर नंबर, जमीन इत्यादीसाठी तलाठी किंवा ग्रामपंचायत याच्याकडील '८–अ'च्या उताऱ्याचा वापर केलेला आहे का? **(हो/नाही)**<br>३.४ गणना–पत्रकाच्या अनुसूची/गणना–पत्रक स्थानिक भाषेमधे आहे का? **(हो/नाही)**<br>**गणना सुरू झाल्यानंतर :**<br>**४.० माहिती घेण्याची पद्धत :**<br>(यासाठी गावातील सर्वांत वंचित/गरीब कुटुंबांना पुढील प्रश्न विचारता येतील प्रत्येक कुटुंबाच्या उत्तरांची नोंद वेगळी ठेवल्यास ते आकडेवारी तयार करण्याच्या दृष्टीने सोयीचे ठरेल.)<br>४.१ सर्व कुटुंबातील जबाबदार व योग्य माहिती देऊ शकणाऱ्या व्यक्तीकडून माहिती घेतलेली आहे का? **(हो/नाही)**<br>४.२ माहिती घेताना प्रत्येक प्रश्न (निर्देशक) व त्याला दिलेले पाचही पर्याय प्रत्येक कुटुंबप्रतिनिधीला समजावून सांगितलेले आहेत का? **(हो/नाही)**<br>४.३ कोणत्या पर्यायाला किती गुण मिळणार, का, हे प्रत्येक कुटुंबप्रतिनिधीला समजावून सांगितलेले आहे का? **(हो/नाही)**<br>४.४ माहिती देणाऱ्या व्यक्ती समोर असतानाच प्रत्येक पर्यायाला गुण दिलेले आहेत का? **(हो/नाही)**<br>४.५ संपूर्ण गणना–पत्रक 'बॉलपेननेच' भरलेले आहे का? **(हो/नाही)**<br>४.६ गणना–पत्रकातील गुणांची बेरीज झाल्यावर ती बेरीज माहिती देणाऱ्या व्यक्तीला सांगितलेली आहे ना? आपल्याला किती गुण मिळालेले आहेत हे समजल्यानंतरच माहिती देणाऱ्या व्यक्तीने गणना–पत्रकावर सही केलेली आहे ना? **(हो/नाही)**<br>४.७ दुसऱ्या कुटुंबाचे गणना–पत्रक भरण्यापूर्वी पहिले गणना–पत्रक सहीसकट माहिती देणाऱ्या व्यक्तीच्या डोळ्यांसमोरच पूर्ण झालेले आहे का? **(हो/नाही)**<br>**५.० मिळालेल्या माहितीची खातरजमा :**<br>५.१ घर, स्वच्छतेच्या सोयी, सुविधा, साधने इ. बाबतची माहिती तोंडी विचारण्याच्या जोडीने प्रगणकाने पूरक माहिती इतर म्हणजे प्रत्यक्ष मार्गाने घेतलेली आहे का? (उदा. घर पक्के की | |

| तपशील | कोड |
|---|---|
| कच्चे हे बघण्यासाठी संपूर्ण घर स्वतः बघणे) तसेच योग्य ती कागदपत्रे बघून, तसेच योग्य त्या शासकीय अधिकाऱ्यांकडून (उदा. तलाठी, विभागीय परिवहन अधिकारी) जमीन किंवा वाहन याबाबतची तपासणी करून, मिळालेली माहिती खरी असल्याची खात्री केलेली आहे का? **(हो/नाही)** | |
| ५.२ स्थलांतरित कुटुंबांची माहिती शेजाऱ्यांकडून किंवा ग्रामपंचायतीकडून घेतलेली असल्यास ग्रामसभेमधे या माहितीची खातरजमा करून घेतलेली आहे का? **(हो/नाही)** | |
| **६.० सर्व गणना-पत्रके भरून झाल्यानंतर :** | |
| ६.१ प्रत्येक कुटुंबाला एकूण किती (५२ पैकी) गुण मिळाले आहेत याची 'कच्ची यादी' चावडी, ग्रामपंचायत, समाजमंदिर, इतर सार्वजनिक ठिकाणे, अशा ठिकाणी लावून ग्रामपंचायतीने जाहीर केलेली आहे का? **(हो/नाही)** | |
| ६.१.१ गावातील कोणत्याही/प्रत्येक कुटुंबाच्या सहज नजरेस पडेल अशा ठिकाणी यादी लावली गेली आहे का? **(हो/नाही)** | |
| ६.२ ही यादी चढत्या क्रमानुसार केलेली आहे का? (म्हणजेच सगळ्यात कमी गुण मिळालेल्या कुटुंबाचे नाव व गुण पहिल्या क्रमांकाला, तर सगळ्यांत जास्त गुण मिळालेल्या कुटुंबाचे नाव व गुण शेवटच्या क्रमांकाला, अशा पद्धतीने ही यादी केलेली आहे का?) **(हो/नाही)** | |
| ६.३ प्रत्येक कुटुंबाने आपल्याला मिळालेले गुण वाचून, यादी पाहून त्याबद्दलच्या तक्रारी ग्रामपंचायत कार्यालयात नोंदवल्या आहेत का? **(हो/नाही)** | |
| ६.४ ग्रामपंचायतीने या तक्रारींची दखल घेऊन, प्रगणकांच्या मदतीने योग्य ती तपासणी करून, आवश्यक ते बदल करून 'प्रारूप यादी' तयार केली आहे का? **(हो/नाही)** | |
| **७.० प्रारूप यादीला ग्रामसभेत मंजुरी :** | |
| ७.१ प्रारूप यादी ग्रामसभेत मांडली गेली आहे का? **(हो/नाही)** | |
| ७.२ ही ग्रामसभा घेण्यासाठी गटविकास अधिकारी आले होते का? **(हो/नाही)** | |
| ७.३ गावातील सर्व कुटुंबे, सामाजिक कार्यकर्ते, बँकेचे अधिकारी/कर्मचारी, सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी या ग्रामसभेसाठी उपस्थित होते का? ग्रामपंचायत तसेच गटविकास अधिकारी यांनी त्यासाठी प्रयत्न केले का? **(हो/नाही)** | |
| ७.४ प्रारूप यादीबद्दलच्या तक्रारी गट-विकास अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज देऊन नोंदवल्या गेल्या का? **(हो/नाही)** | |
| ७.५ या तक्रारींची दखल घेऊन, 'जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-प्रकल्प संचालक' यांच्या आदेशाने आवश्यक ती तपासणी पुन्हा केली गेली का? त्यानुसार यादीमध्ये योग्य ते बदल केले गेले का? **(हो/नाही)** | |
| ७.६ गटविकास अधिकाऱ्यांना सादर केलेली यादी सर्व गावकऱ्यांनी मंजूर केलेली आहे का? तशी खात्री गटविकास अधिकाऱ्यांनी करुन घेतली आहे का? **(हो/नाही)** | |

# उपस्थित कार्यकर्त्यांची नावे व संपर्क पत्ते

१. गणपत बोथले, ग्रामीण विकास प्रबोधिनी,
मु. पोस्ट देवरुख, कॉलेजजवळ, रत्नागिरी–४१५८०४.
फोन नं. : ०२३५४–४१७०७

२. अशोक धामणे, जनसहयोग प्रतिष्ठान,
मु.पो. कोसुंब, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी–४१५८०४.
फोन नं.– ०२३५४ – ४१२१३

३. सुरेखा दळवी, श्रमिक मुक्ती संघटना,
कृष्णकुंज, ३६, शिवाजी पार्क, डॉ. एम. बी. राऊत मार्ग,
दादर, मुंबई – ४११०२८. फोन नं.: ०२२–४४५८४८९

४. उल्का महाजन, सर्वहारा जन आंदोलन,
बी–२०२, पायल सोसायटी, अभ्युदय बँकेजवळ,
सेक्टर–१७, न्यू पनवेल, फोन नं.– ०२१४०–६३२६३.

५. प्रकाश कांबळे
८, मंगेशपार्क, भाऊ करंजकर मार्ग, एरंड्वणे,
पुणे – ४११०३८. फोन नं.– ५४६२ ९०९

६. मुकुंद दीक्षित
४४१८, मालवीय चौक, पंचवटी, नाशिक – ४२२००३.

७. प्रतिभा शिंदे
शांती निवास, मोठा माळीवाडा, मु. पो. ता. तळोदे,
जि. नंदूरबार – ४२५४१३.
फोन नं.: ०२५६७–२३२४८४/०२२३२ ५०२६४१

८. सारंग पांडे, लोकपंचायत,
लेन. नं. ३, शिवाजीनगर, एटी/पीओ/टीए–संगमनेर,
अहमदनगर – ४२२६०५. फोन नं.: (०२४२५)
२२७१३४, २२४५३१/९४२२२ ५६३२५

९. सुरेश सावंत
३०५, कृष्ण अपार्टमेंट, सेक्टर –१२, कोपरखैरने,
नवी मुंबई – ४००७०९.
फोन नं.– (०२२) २४२२ ५२६५ / २७५ ४४९९७६

१०. मारोती जळबा वड्डे, C/o शितोळे बिल्डिंग, कोतवाल नगर,
डॉ. गायकवाड यांच्या दवाखान्याजवळ, कर्जत,
जि. रायगड. फोन नं.: २२२९४०

११. भरतकुमार पं. दहिहंडे,
बी–९, पारस ओशन व्ह्यू, टी.व्ही. सेंटर लेन,
शिबा पॅलेस रोड, रत्नागिरी –४१५६१२.
फोन नं. – (०२३५२) २७०१२०/२२०९६३

१२. शालिनी माणिक वाघमारे,
मु.पो. बेंडकी ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर,
फोन नं. – ०७१७२–२७५१०२

१३. संजय महादेव सावंत,
८, 'सत्यम्', काविळतळी, चिपळूण,
जि. रत्नागिरी–४१५६०५ फोन नं. ०२३५५–२५५००८

१४. विजय जाधव
माळीवाडा, सवेरा कॉम्प्लेक्स समोर, जहागिरदार कॉम्प्लेक्स्,
वॉर्ड क्र. ८२, नॅशनल बुऱ्हाणी हायस्कूलजवळ, जुना बाजार,
औरंगाबाद. फोन नं. : ०२४०–३१०२६६०

१५. डायगो डिसोजा, जनसेवा मंडळ,
कोरीट रोड, फोन नं. २२२०३२

१६. श्री. हनुमंत दत्तात्रेय जाधव,
मु.पो. धामणी, ता. आंबेगाव, जि.पुणे.
फोन नं.–९५२१३३–२६२१६५

१७. महेंद्रकुमार हरिश्चंद्र चव्हाण
मु.पो. सणसर, ता. इंदापूर जि. पुणे.
फोन नं. ०२११८–२६६५९४

१८. विपुला अभ्यंकर,
सुहासिनी बी, तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर–२,
पुणे – ४११ ००९. फोन नं.२४२२०१८८

१९. राजेंद्र परशुराम धेंडे,
११, नक्षत्र बंगला, प्रकाशनगर, पो. माधवनगर, कूप्रवाड रोड,
सांगली–४१६४१६. फोन नं.०२३३–३१०२७७४

२०. मनीषा तोकले
१६ वावर भाग्यनगर, नवगन कॉलेज रोड, बीड–४३११२२.
फोन नं. ९४२२७४५५७६

२१. वैशाली पाटील
ए–१०२, शंकर शमा कॉम्प्लेक्स्, सरकारी दवाखान्याजवळ,
चिंचपाडा, पेण, जि. रायगड,
फोन नं. : ०२१४३–२५३६९१/९८२२५१४२११

२२. माया वानखेडे,
७/ए, मुळीक कॉम्प्लेक्स, वर्धा रोड, नागपूर – ४४००२५.
फोन नं. ९८२२४६४२७०

२३. अजित श्रीकृष्ण अभ्यंकर
सुहासिनी बी अपार्टमेंटस्, तुळशीबागवाले कॉलनी,
गल्ली क्र. ३, सहकारनगर–२, पुणे – ४११००९.
फोन नं. ०२०–२४२२०१८८

२४. तुकाराम शिंदे,
मु. एकुर्का (रोड), पो. कलुर, ता. उदगीर, जि. लातूर,
फोन नं.०२३८५–२६०४६४

२५. भीमराव शिंदे,
मु.पो. बाऱ्हाळी, ता. मुखेड, जि. नांदेड.
फोन नं. ०२४६१–२४६२०१

२६. पंचफुला बिराजदार, प्रगती महिला मंडळ,
मु.पो. बापशेटवाडी, ता. मुखेड, जि. नांदेड,
फोन नं. ०२४६१–२४६२३३

२७. नितीन मते
फ्लॅट नं.१, तिरूपती अपार्टमेंट, बँक कॉलनी, दुर्गानगर,
मानेवाडा रोड, नागपूर. फोन नं. ०७१२–२७०२२८८

२८. शारदा रेणके
एफ–१/ए–५, अवंतीनगरी, जुना पुणे नाका, सोलापूर.
फोन नं. ०२१७–२६२७६२८

२८. महेंद्र गजानन थोरात
मु.कान्हेवाडी, मु.पो. कडधे, ता.खेड, जि. पुणे.
फोन नं.९५२१२५–२७३३३७

३०. अशोक जगन्नाथ भोसले
मु.पो. गोंदवले काळ, ता. माण, जि. सातारा.
फोन नं. ०२१६५–२५८०२१

३१. रोहन व्ही. प्रभु
पहिला मजला, नवजीवन हॉस्पिटल, नवबाग रोड,
कुरुंदवाड, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर–४१६१०६.
फोन नं. ०२३२२– २४४२६७/३६७,
फॅक्स नं. ०२३२२–२४४२६७

३२. डॉ. शिल्पा रोहन प्रभू,
नवजीवन हॉस्पिटल, नवबाग रोड, कुरुंदवाड–४१६१०६,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. फोन नं. ०२३२२–२४४२६७

३३. मेधा थत्ते,
१२४५ शुक्रवार पेठ, आनंदी विकास, पुणे.
फोन नं. २४४५२०५३, मोबाईल –९८२२४५३४२१

३४. एम.बी. नायकोडी
मु. तेजेवाडी, पो. शिरोळी बु. ता.जुन्नर, जि. पुणे.
फोन नं. ९५२१३२–२७८४६४,९५२२–२३४३३४०२

३५. अरुणा सुभाष अटोळे
मु.पो. रावणगाव, ता. दौंड, जि. पुणे.

३६. संगीता राजेंद्र गावडे,
मसनेर वाडी, ता. दौंड, जि. पुणे, फोन नं. ६५७४८

३७. मालनबाई तुकाराम येडे,
मसनेर वाडी, ता. दौंड, जि. पुणे, फोन नं. ५६५७४८

३८. पांडुरंग शिंदे,
एफ–१, ए–५, आवंती नगरी, जुना पुना नाका,
सोलापूर–४१३००२. फोन नं.२१७– २६२७६२८

३९. हणमंत उल्लेश्वर बारबोले
मु.पो. दारफळ (सिना), ता. माढा, जि. सोलापूर.
फोन नं. २४६१९१–०२१८३

४०. जॉन पी. ॲब्राहम,
जि. अहमदनगर, पुणतांबा – ४१३७०७.
फोन नं. २४२३–२७४२८२

४१. मिलिंद बोकील
१०४, कांचनगंगा, कांचनगल्ली, पुणे – ४११००१.
फोन नं. ०२०–५४२४६८३

४२. ललित बाबर, सामाजिक न्याय प्रतिष्ठान,
२११, इंदिरा नगर, लिंक रोड, गोरेगाव(प.),
मुंबई–४००१०४. फोन नं. २८४००२६८

४३. सचिन फाटक, परिवर्तन,
दत्त साई टॉवर, तळ मजला, दत्त मंदिराजवळ,
चिपळूण कराड रोड, खेर्डी, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी.
फोन नं.– ०२३५५ – ५४७४०, ५६०५२, ५०५७१.

४४. ख्रिस्तोफर माने, लोकविकास सामाजिक संस्था,
पेठरोड, नाशिक–४२२००३

४५. मधुकर सु. पोळ

## प्रयासच्या संसाधने व उपजीविका गटातर्फे चालणारे काम

२००० सालापासून प्रयास ऊर्जा गटांतर्गत 'संसाधने व उपजीविका' गट कार्यरत आहे. या गटामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक संसाधने व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची उपजीविका या विषयावर काम सुरू आहे. वंचित घटकांच्या उपजीविकेचा प्रश्न विकासावरील चर्चेच्या व प्रयत्नांच्या केंद्रस्थानी कसा आणता येईल यावर संसाधने आणि उपजीविका गट काम करीत आहे. या गटात खालील विषयांवर काम चालू आहे.

१) शाश्वत उपजीविकेचा विकासविषयक दृष्टिकोनाच्या मांडणीचे काम

शाश्वत उपजीविका या विषयावर संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन अंगाने काम करण्याचा या गटाचा उद्देश आहे. यामध्ये, 'शाश्वत उपजीविका' यावर आंतरराष्ट्रीय स्तरावर चाललेल्या चर्चेचा अभ्यास करणे आणि या चर्चेत सहभागी असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांच्या भूमिकेची चिकित्सा करणे हा या कामाचा एक भाग आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांसमोर या चर्चेचे विश्लेषण मांडून त्यांची दृष्टी, त्यांचा अनुभव आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चेमध्ये नेण्यासाठी प्रयत्न करण्याची या गटाची इच्छा आहे. तसेच पर्यायी प्रतिमानाच्या संकल्पनात्मक बाजूवर विचार करणे आणि 'शाश्वत उपजीविकेच्या विकासविषयक दृष्टिकोनाची (Sustainable Livelihood Perspective) संकल्पनात्मक आणि कार्यक्रमात्मक अशा दोन पातळ्यांवर मांडणी करणे, हा या कामाचा दुसरा भाग आहे.

२) अ) आदिवासी कुटुंबाच्या प्रत्यक्षातील उपजीविकांचे विवरण

रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या उपजीविकेच्या परिस्थितीसंबंधी सखोल माहिती मिळवणे हे या अभ्यासामागील प्रमुख उद्दिष्ट आहे.

ब) इतर अभ्यासात्मक उपक्रम

- रायगड जिल्ह्यातील सरकारी पातळीवर दारिद्र्य–निर्मूलन व आदिवासी विकासाचा योजनांचा अभ्यास तळागाळातील संघटनांच्या दृष्टीतून करणे.
- सरकारने स्वीकारलेल्या पर्यायी योजनेचा (परसबाग योजना) अभ्यास करणे.

३) कमी बाह्य साधनांची शाश्वत शेती

समाजातील वंचित समूहाच्या शाश्वत उपजीविकेसाठी रोख पैसे व बाह्य साधनाची गरज कमी असणाऱ्या कसणुकीच्या पद्धती व तंत्रे (विशेषत: नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनासंबंधी) यावर काम करणे हा गटाचा दुसरा प्रमुख उद्देश आहे. या कामामध्ये प्रयोग, प्रत्यक्षदर्शन (डेमॉन्स्ट्रेशन), प्रशिक्षण, व माहितीसंकलन असा चार सूत्री कार्यक्रम चालू आहे.

## प्रयासविषयी

’प्रयास’ हा वैद्यकीय व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील काही व्यावसायिकांनी एकत्र येऊन स्थापलेला व कायद्यानुसार नोंदलेला सार्वजनिक विश्वस्त निधी आहे. प्रयासच्या वतीने ’आरोग्य’, ’ऊर्जा’, ’शिक्षण व पालकत्व’ तसेच ’संसाधने व उपजीविका’ ह्या क्षेत्रांत अनेक उपक्रम चालवले जातात. आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये वापरुन समाजातील वंचित वर्गांच्या स्वउन्नतीसाठीच्या प्रयत्नांना व संघर्षांना साहाय्यभूत ठरावे ह्या उद्देशाने प्रयासचे सदस्य काम करीत असतात. संशोधन, विश्लेषण, प्रशिक्षण, माहितीचा प्रसार, वाङ्मयनिर्मिती, इ. विविध मार्गांनी वरील उद्देशांच्या पूर्तीसाठी प्रयत्न केले जातात.

प्रयास

**संसाधने व उपजीविका गट :** ‘मंगेशपुष्प’, सर्व्हे नं. १३३, स्वामी विवेकानंद सोसायटी, बायफच्याजवळ, वारजे, पुणे – ४११०५२, ☎ ५२३२८३६, मोबाईल. – ९४२२३१७५३०, फॅक्स – ५४२०३३७
E-mail: reli@vsnl.net Web-site: www.prayaspune.org

**नोंदणीकृत कार्यालय :** अमृता क्लिनिक, आठवले कॉर्नर, कर्वे रोड, पुणे–४११००४, ☎ ५४४१२३०, ५४२०३३७.